किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३● स्थिर - अस्थिर
५● 'ब्रिक्स'च्या पुढ्यातील आव्हाने
९● 'ब्रिक्स'च्या अंतरंगात....
१५● स्थित्यंतराच्या मार्गावरील ब्राझील
२१● मातीमोल नव्हे माती "मोल"!!
२७● दुःखातही आहे सुख!
३१● अर्थबोधपत्रिका पुरवणी
आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद
■ निकड, किमान समान आर्थिक कार्यपत्रिकेची...

**खंड १२ : अंक ९** **डिसेंबर २०१३**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**
**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १२ (अंक ९) डिसेंबर २०१३**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*
- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# स्थिर-अस्थिर

'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांना येऊ घातलेल्या नववर्षाच्या अत्यंत मनापासून शुभेच्छा.

"बघता बघता वर्ष संपले की..." हे वाक्यही आता वापरून वापरून गुळगुळीत झालेले आहे. त्यामुळे, "वर्ष संपले" यांपेक्षाही ते "कसे संपले", हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. त्या मानाने २०१३ हे वर्ष बरेच स्थैर्याचे ठरले. एक तर, मॉन्सून वेळेवर आणि सरासरी इतका झाल्याने शेतीइतकीच पिण्याच्या पाण्याची बेगमी पुरेपूर झाली. गेल्या वर्षी पावसानेच सगळयांच्या डोळ्यांत पाणी आणले होते. त्यामुळे, त्या आघाडीवर यंदा सगळे शांत व समाधानी वातावरण राहिले. येत्या वर्षामध्ये निवडणुका असल्याने केंद्रात काय अथवा राज्यात काय, कोणतीही सरकारे कोणत्याही प्रकारची जोखीम उचलण्याच्या मनःस्थितीत नसल्याने राजकीय अथवा सामाजिक कारणांपायी अस्थिरता निर्माण होण्यास मुदलातच फारसा वाव नव्हता. त्यामुळे, विविध आघाड्यांवर २०१३ हे वर्ष त्या मानाने स्थिरतेचे ठरले. पण, ही स्थिरता क्रियाशीलतेच्या अभावातून निर्माण झालेली होती अथवा आहे, असे म्हणण्याखेरीज गत्यंतर नाही. एखादी व्यक्ती आजारी नाही म्हणजे ती संपूर्णतः निकोप, निरोगी आहे असे सरसहा समजता येत नाही. दुस-या भाषेत सांगायचे तर, रोगाची अनुपस्थिती म्हणजे निरोगी म्हणता येत नाही. शरीरांतर्गत विविध व्यवस्था व संस्था ख-या अर्थाने तंदुरुस्त, शुद्ध आणि निकोप असणे, हे निरोगी प्रकृतीचे गमक समजले जाते. तसेच या सध्याच्या स्थिरतेचे आहे. कोठेच काही घडत नाही म्हणून सारे कसे स्थिर दिसते आहे. अस्थैर्याला जन्म देणारे घटक व्यवस्थेतूनच हद्दपार झालेले असल्याने स्थैर्य नांदते आहे, असे म्हणणे खरोखरच धाडसाचे ठरेल. "ब्रिक्स" या लघुरूपाने ओळखल्या जाणा-या देशसमूहातील काही देशांच्या अर्थकारणाचा तसेच समाजकारणाचा या अंकात जरा खोलवर जाऊन घेतलेला मागोवा या वास्तवास पुष्टी देईल. ब्राझील, चीन व रशिया यांसारखे "ब्रिक्स"मधील मोठे देश नाना प्रकारची संरचनात्मक असंतुलने व विरोधाभासांनी व्यापलेले आहेत.



तरीदेखील, त्यांतल्या त्यांत याच देशसमूहात त्या मानाने आर्थिक आघाडीवर फारसे अस्थैर्य दिसत नाही, असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते. पण म्हणजे तेथे सारे कसे आलबेल आहे, असे कोणीच म्हणणार नाही. एखाद्या व्यक्तीचा चेहेरा केवळ शांत दिसतो म्हणून तिचे अंतःकरणही तितकेच प्रशांत आहे, असे म्हणता येत नाही. व्यक्तीच्या मनःस्थितीनुसार तिची विचारप्रक्रिया कशी बदलत असते, यांबाबत सध्या सुरू असलेल्या काही संशोधनांचे या अंकात मांडलेले सार स्थिर-अस्थिरतेच्या एकंदरच पैलूकडे बघण्याची दृष्टी अधिक प्रगल्भ होण्यास हातभार लावणारे ठरावे. पायाखालची माती स्थिरअबोल असते म्हणूनच बहुधा आपण तिची उपेक्षा करतो. मात्र, त्या जीवनदायी मातीचे यथार्थ 'मोल' आपण जाणले नाही तर आपले एकंदरच जीवन किती अस्थिर बनेल याचा या अंकात मांडलेला आलेख आपली स्थिरता अंतर्बाह्य ढवळून टाकण्याइतपत ताकदवान नक्कीच आहे. ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in या संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आर्थिक

# ‘ब्रिक्स’च्या पुढ्यातील आव्हाने

‘ब्रिक’ ही शब्दसंहती जागतिक समुदायाच्या मुखी रुळल्याला आता जवळपास एक तप उलटून गेले. ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या चार देशांच्या इंग्रजी नामोच्चारणातील स्पेलिंगमधील आद्याक्षरांचे हे एकत्रित लघुरूप. २००१ साली हे लघुरूप प्रथमतः व्यवहारात आणले ते जिम् ओनील यांनी. पुढे २४ डिसेंबर २०१० रोजी दक्षिण आफ्रिकेचाही या चमूमध्ये समावेश झाला आणि ‘ब्रिक’चे रूपांतर ‘ब्रिक्स’मध्ये घडून आले. हे पाचही देश तसे म्हटले तर ‘विकसनशील’ या गटात मोडणारे. या गटातील देशांना ‘नवऔद्योगिक’ अथवा ‘नव्यानेच औद्योगीकरण झालेले देश’ असेही संबोधले जाते. ‘ब्रिक्स’मधील पाचही देश नवऔद्योगिकच आहेत. हे पाचही देश आकारमान आणि लोकसंख्या या दोन्ही अंगांनी चांगलेच विशाल आहेत. आजघडीला या पाचही देशांची लोकसंख्या जवळपास तीन अब्जांच्या घरात जाते. आपापल्या खंडातील अथवा उपखंडातील स्थानीय अर्थकारणात तसेच भू-राजकीय व्यवस्थेमध्ये स्वतःचा दबदबा चांगल्यापैकी राखून असलेले देश, अशीच या समूहातील प्रत्येकाची ओळख आहे. अलीकडील काळात अतिशय जोमाने आणि दमदारपणे वाढलेल्या व वाढत असलेल्या अर्थव्यवस्था असाही या पाच देशांचा लौकिक आहे. त्यामुळे, येत्या अर्धशतकभराच्या काळात एकंदरच जगाच्या अर्थरंगमंचावर महत्त्वाची भूमिका बजावण्याची क्षमता अंगी जोपासून असणाऱ्या देशांचा समूह म्हणूनच ‘ब्रिक्स’ देशांकडे बघितले जाते.

अमेरिकी ‘सबप्राइम’ कर्जामधून निपजलेल्या आर्थिक अरिष्टामधून जागतिक अर्थव्यवस्थेला बाहेर खेचण्याची क्षमता ‘ब्रिक्स’ देशांमध्येच असल्याची भावना आताआतापर्यंत अनेक जण बोलून दाखवत होते. परंतु, २०११ सालानंतरचे या पाच अर्थव्यवस्थांमधील चित्रही त्या आशावादाची तळी उचलणारे राहिलेले नाही. किंबहुना, या पाच देशांच्या अर्थव्यवस्थांच्या पुढ्यात उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा ऊहापोह त्यामुळेच आवश्यक ठरतो.



या आव्हानांचा उच्चार अगदी अलीकडे केला तो भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी. आंतरराष्ट्रीय स्पर्धाविषयक अनेकविध बाबींसंदर्भात चर्चा करण्यासाठी ‘ब्रिक्स’ देशांची एक परिषद अगदी अलीकडे नवी दिल्ली येथे भरली होती. ‘आंतरराष्ट्रीय स्पर्धा’ या विषयाला वाहिलेल्या या परिषदेचे ते तिसरे अधिवेशन होते. त्या अधिवेशनाचे उद्घाटन करते वेळी डॉ. मनमोहनसिंग यांनी ‘ब्रिक्स’ देशांच्या पुढ्यात आजघडीला उभ्या ठाकलेल्या आणि येत्या काळात ज्यांचे स्वरूप कदाचित अधिक बिकट होण्याची शक्यता संभवते अशा आव्हानांचा रेखाटलेला आलेख मननीय ठरावा. विस्मयाचा भाग म्हणजे, या आव्हानांसंदर्भात पंतप्रधानांनी केलेल्या संपूर्ण विवेचनाची फारशी दखल इंग्रजी अथवा प्रादेशिक भाषांतील माध्यमांनी घेतलेली दिसली नाही.

गुंतवणूकयोग्य भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर घडून येणाऱ्या अल्पकालीन व सट्टेबाज स्वरूपाच्या हस्तांतरण अथवा चलनवलनापायी भांडवली बाजारपेठांत निर्माण होणाऱ्या अतर्क्य आणि अनपेक्षित लहरींचा मुकाबला ‘ब्रिक्स’ देशांच्या अर्थव्यवस्थांना येत्या काळात करावा लागेल, या पहिल्या मोठ्या आव्हानाकडे डॉ. मनमोहनसिंग यांनी प्रकर्षाने निर्देश केला. खास करून, जागतिक अर्थकारणात सध्या एकंदरच अस्थिरता नांदत असल्याने या आव्हानाची वारंवारता आणि तीव्रता वाढू शकते, असेही त्यांचे प्रतिपादन होते. जागतिक स्तरावर भांडवलाच्या अशा अल्पकालीन चलनवलनाला खतपाणी घालणारा अलीकडच्या काळातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे अमेरिकी फेडरल रिझर्व्हचे नजिकच्या भविष्यातील पैसाविषयक धोरण कसे असेल यांबाबतची उत्सुकता वा अनिश्चितता.

अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मंदीचे मळभ हटवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अतिशय उदार, विस्तारवादी असे पैसाविषयक धोरण अमेरिकी फेडरल रिझर्व्ह अलीकडील काळात सतत राबवते आहे. अमेरिकी अर्थविषयक भाषाव्यवहारात त्याचा निर्देश ‘‘क्वॉन्टिटेटीव्ह ईझिंग’’ असा केला जातो. अमेरिकी उद्योगधंद्यांना गुंतवणुकीसाठी आकर्षक व्याजदराने मुबलक भांडवल अथवा रोखता उपलब्ध व्हावी यासाठी अर्थव्यवस्थेत भरपूर पैसा सोडणे म्हणजे ‘‘क्वॉन्टिटेटीव्ह ईझिंग’’.

आजवर अवलंबण्यात येत असलेले हे असे उदार पैसाविषयक धोरण अमेरिकी फेडरल रिझर्व्ह येत्या काळातही चालू ठेवेल अथवा नाही यांवर ''ब्रिक्स'' देशांच्या अर्थव्यवस्थांकडे वाहणा-या भांडवल प्रवाहांचे भविष्यातील आकारमान अवलंबून राहणार आहे. त्याला कारण आहे तो आजवरचा या संदर्भातील अनुभव. अमेरिकी अर्थव्यवस्थेत बेरोजगारीचे प्रमाण अजूनही चांगले मोठे असल्याने फेडरल रिझर्व्हकडून कितीही मात्रेने भांडवल उपलब्ध होत असले तरी ते उचलण्यास अमेरिकी उद्योगजगत अजूनही धजावत नाही. परिणामी, ''क्वॉन्टिटेटीव्ह ईझिंग''द्वारे अमेरिकी अर्थव्यवस्थेत सोडला जाणारा पैसा 'ब्रिक्स' देशांच्या अर्थव्यवस्थांकडे आपला मोहोरा वळवतो. त्यांमुळे, 'ब्रिक्स' देशांमधील भांडवल बाजारांत चढउतार जाणवतात. यथावकाश, अमेरिकी फेडरल रिझर्व्हने ''क्वॉन्टिटेटीव्ह ईझिंग''बाबत हात आखडता घेतल्यास हा पैसा पुन्हा एकवार आपले तोंड अमेरिकी अर्थव्यवस्थेकडे वळवेल आणि त्याची परिणती नवऔद्योगिक देशांच्या अर्थव्यवस्थांमधील भांडवल बाजारांत पडझड होण्यात घडून येईल, असा इषारा डॉ. मनमोहनसिंग यांनी 'ब्रिक्स' देशांच्या परिषदेच्या व्यासपीठावरून दिलेला आहे. अशा पडझडीचा तुलनेने तीव्र चटका बसतो तो विकसनशील देशांमधील छोट्या व अनभ्यस्त गुंतवणुकदारांना. त्याचप्रमाणे, विकसनशील अर्थव्यवस्थांमधील ज्या उद्योगक्षेत्रांमध्ये असा हा पैसा अल्पकालासाठीच गुंतवलेला असतो त्या उद्योगक्षेत्रांमध्येही मग अनपेक्षित तेजीमंदीचे हेलकावे जाणवतात. यांमुळे, अर्थव्यवस्थेत जी अल्पकालीक अस्थिरता निर्माण होते तिचा मुकाबला 'ब्रिक्स' देशांना पुढील काळात वेळोवेळी करावा लागेल, असा सावधगिरीचा संकेत डॉ. मनमोहनसिंग यांनी त्यांच्या विश्लेषणाच्या माध्यमातून उलगडून मांडला.

''ब्रिक्स'' देशांतील सरकारांच्या पुढ्यातील दुसरे मोठे आव्हान म्हणजे वित्तीय व्यवस्थापनाचे. हा मुद्दा मुख्यतः एकवटलेला आहे तो वित्तीय तुटीला आळा घालण्याच्या पैलूभोवती. भांडवलाच्या अल्पकालीन जागतिक चलनवलनाप्रमाणेच या आव्हानाचा धागाही गुंफलेला आहे तो २००८ सालानंतर अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये आणि पर्यायाने वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये उद्‌भवलेल्या वित्तीय संकटाशी.



''सबप्राइम'' कर्जांचा डोंगर कोसळल्यानंतर अमेरिकी आणि युरोपीय बाजारपेठांमधील मागणी एकदम खचली. त्यामुळे, आर्थिक विकासाचे निर्यातप्रधान ''मॉडेल'' आजवर अवलंबलेल्या देशांच्या निर्यातीवर आणि पर्यायाने एकंदरच अर्थव्यवस्थांवर अमेरिकी मंदीची छाया पसरली. आपापल्या अर्थव्यवस्थांना टेकू पुरविण्यासाठी, मग, त्या त्या देशांतील धोरणकर्त्यांना सार्वजनिक खर्चात वाढ घडवून आणून देशी अर्थव्यवस्थेतील मागणी टिकवून धरण्याचा पर्याय स्वीकारण्यावाचून गत्यंतर उरले नाही. त्यामुळे, सरकारच्या खर्चात घसघशीत वाढ झाली. दुसरीकडे, सर्वसाधारण आर्थिक वाढीचा सरासरी वेग एकदम खाली आल्याने सरकारच्या महसुलात घट आली. तिसरीकडे, उद्योगांना आधार पुरविण्यासाठी नाना प्रकारच्या करसवलती देऊ करण्यानेही महसुलाच्या प्रवाहात खोट आली. खर्चात वाढ आणि महसुलात घट या दोन्हींपायी वित्तीय तुटीचे आव्हान आज अनेक देशांत गंभीर बनते आहे. त्याच वेळी, आर्थिक विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक बनावी यांसाठी अनेक देशांनी कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचे सत्र राबविलेले आहे. त्यामुळे, सरकारी खर्चात कपात घडवून आणण्यास फारसा वाव नसतानाही वित्तीय तुटीवर नियंत्रण ठेवण्याची तारेवरची कसरत ''ब्रिक्स'' देशांतील सरकारांना येथून पुढच्या काळात करावी लागणार आहे, असा जो सूचक इषारा डॉ. मनमोहनसिंग यांनी दिला तो खरोखरच चिंतनीय असा आहे.

याच परिषदेमध्ये डॉ. मनमोहनसिंग यांनी सगळ्यांचेच लक्ष वेधले ते सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची स्पर्धाक्षमता उंचावण्याच्या मुद्याकडे. ''ब्रिक्स'' देशांत आजही सरकारी क्षेत्राचे महत्त्व व माहात्म्य जाणवण्याइतपत आहे. त्यामुळे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची सर्वसाधारण कामगिरी कार्यक्षम बनणे हे एकंदरच अर्थकारणाच्या प्रकृतीचा विचार करता हिताचे ठरते. अतिरिक्त सरकारी संरक्षणापायी स्पर्धेपासून वंचित राहिल्याने सार्वजनिक उद्योगांत नाना स्तरांवर ज्या अकार्यक्षमता साचत राहतात त्यांचा निरानिपटा करायचा तर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना स्पर्धासन्मुख बनवलेच पाहिजे, या प्रतिपादनाचा स्वीकार ब्रिक्स देशांतील धोरणकर्ते कितपत गांभीर्याने करतील, हा एक मोठा औत्सुक्याचा विषय बनतो. ■■

आर्थिक

# 'ब्रिक्स'च्या अंतरंगात....

ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या ''ब्रिक्स''मधील चार देशांमध्ये एक साम्य आहे. आणि ते म्हणजे हे चारही देश आकारमानाने चांगले मोठे आहेत. त्यांतील चीन व भारत हे दोन देश लोकसंख्याबहुल असल्याने या दोन देशांतील लोकसंख्येची घनताही खूप मोठी आहे. भारत आणि चीन या दोन अर्थव्यवस्थांबद्दल या ना त्या माध्यमांतून वेळोवेळी भरपूर ऊहापोह होत असतो. त्यांमानाने ब्राझील आणि रशिया या दोन अर्थव्यवस्थांबाबत प्रादेशिक माध्यमांतून फारसे काही वाचावयास मिळत नाही. खरे पाहता, ब्राझील, चीन आणि भारत या तीन देशांतील अर्थवास्तवात ब-याच प्रांतांत बरेचसे साधर्म्य दिसते. त्यांमुळे, ब्राझील व चीन या दोन अर्थव्यवस्थांच्या अंतरंगाचा अंमळ जवळ जाऊन परिचय करून घेणे उपयुक्त ठरावे. भारतीय अर्थवास्तव आणि ब्राझील व चीनमधील अर्थचित्र यांची तुलना करून त्यांद्वारे काही निष्कर्ष प्रत्येकालाच त्याच्या त्याच्या पद्धतीने काढता येतील. रशियाची गोष्ट काहीशी वेगळीच आहे. मुळात तेथील राजकीय चौकटच वेगळी असल्याने या तीन अर्थव्यवस्थांच्या तुलनेत रशियाची अर्थव्यवस्था वेगळ्या प्रकारे आजवर बदलत आलेली दिसते.

त्यांतल्या त्यांतही पुन्हा बघायला गेले तर, ब्राझील आणि चीन या दोन अर्थव्यवस्थांमधील साधर्म्ये आणि वैविध्ये डोळ्यांत भरावीत अशी आहेत. आकारमानाने मोठा आणि पोलाद, साखर, सोयाबीन, कॉफी, पोल्ट्री उत्पादने यांसारख्या अनेकानेक जिनसांचा एक मुख्य निर्यातदार देश असा ब्राझीलचा लौकिक आहे. २००८ सालापासून जागतिक अर्थव्यवस्थेत धुमसणा-या मंदीला ब्राझीलच्या अर्थव्यवस्थेने ब-यापैकी तोंड दिले. दुसरीकडे, चिनी अर्थव्यवस्थाही वैश्विक मंदीला चांगल्यापैकी तोंड देताना दिसते. ब्राझीलसारखाच चीनही आकारमानाने चांगला औरसचौरस देश आहे. तर, विविध जिनसांचा जगातील एक मुख्य आयातदार देश, असा चीनचा लौकिक आहे.



परंतु, ब्राझील आणि चीन या दोन अर्थव्यवस्थांमधील वैविध्यही तितकेच बहुरंगी आहे. अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी चीनने १९७०च्या दशकाच्या शेवटच्या पर्वात जाणीवपूर्वक पावले उचलली. तर, पार गळ्याशी भिडेपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सुधारणा वा पुनर्रचना घडवून आणायचीच नाही, हा ब्राझीलचा खाक्या आजवर दिसत आलेला आहे. चीनच्या तुलनेत ब्राझीलची अर्थव्यवस्था आजही बव्हंशी बंदिस्त आहे. जगातील एक अग्रगण्य निर्यातदार देश असा लौकिक ब्राझील मिरवतो खरा. पण तरीही, ब्राझीलमधून होणारी निर्यात आणि जगभरातून ब्राझीलमध्ये होणारी आयात यांचे ब्राझीलच्या ठोकळ उत्पादिताशी असलेले एकत्रित प्रमाण बघितले तर ते १५ टक्क्यांच्या परिघातच दिसते! चीनमध्ये व्याजाचे दर नियंत्रित आहेत. भांडवल तिथे स्वस्त आहे. ब्राझीलमध्ये व्याजाचे दर चांगल्यापैकी उंचावलेले असल्याने तिथे भांडवल चांगले महाग आहे. निर्यातीवर असर होऊ नये या दृष्टीने चीनने आपल्या चलनाचा अमेरिकी डॉलरबरोबरचा विनिमय दर नियंत्रित राखलेला आहे. ब्राझीलच्या चलनाचा विनिमय दर मात्र खुला आहे.

अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची गती भरधाव राखण्यावर चिनी धोरणकर्त्यांचा मुख्य भर असतो. तर, ब्राझीलच्या लेखी माहात्म्य आहे ते अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याचे. उपभोगप्रवण अशा कल्याणकारी अर्थकारणाबाबत चीन आताशा कोठे विचार करताना दिसतो. सार्वजनिक कल्याणावर भर असणारी धोरणे राबविण्यावर ब्राझीलचा कल केव्हापासूनचाच आहे. त्यामुळे, पायाभूत सेवासुविधांमध्ये भरभक्कम गुंतवणूक करण्याबाबत चीन कमालीचा दक्ष असलेला दिसतो. तर, ब्राझील कल्याणकारी योजना व उपक्रमांकडे मोठ्या प्रमाणावर निधी वळवताना दिसतो. चीन व ब्राझील या दोन्ही देशांच्या अर्थविषयक धोरणांमध्ये असंतुलन आहेच. चीन बचतप्रवणतेला खतपाणी घालतो आणि पायाभूत सेवासुविधांमध्ये बख्खळ गुंतवणूक करून अर्थव्यवस्थेच्या पुरवठाक्षमतेचे संगोपन जाणीवपूर्वक घडवून आणतो. उलट, लोककल्याणाकडे निधी वळविण्याच्या धोरणांपायी (विकासाचा वार्षिक सरासरी दर उंच नसतानाही) ब्राझीलला अलीकडील काळात महागाईचा सामना करावा लागतो आहे.

लोककल्याणकारक शासनव्यवस्थेची प्रणाली स्वीकारल्याने ब्राझीलमध्ये दोन गोष्टी घडलेल्या दिसतात. एक तर, तिथे सरकारी खर्चाची मात्रा आणि ठोकळ देशी उत्पादिताशी सरकारी खर्चाचे असणारे प्रमाण प्रचंड आहे. दुसरे म्हणजे, ब्राझीलची उभी अर्थव्यवस्थाच सरकारी खर्चाच्या टेकूवर विसंबलेली दिसते. आता, असा डोईजड सरकारी खर्च भागवायचा तर सरकारपाशी तसाच भक्कम महसूल हवा. त्यासाठी तशीच खंबीर करप्रणाली हवी. ब्राझीलमध्ये नेमके तेच आहे. सरकारी खर्च भागवण्यासाठी ब्राझीलमध्ये करआकारणी दणकून केली जाते. त्यामुळे, उद्योगांचा उत्पादन खर्च वाढतो. वाढीव खर्च उद्योग मग उत्पादनांच्या वाढीव किंमतींद्वारे ग्राहकांच्या खिशाकडे सरकवतात. परिणामी महागाई आपले बस्तान टिकवून राहते. त्याच वेळी, उत्पादन खर्च मोठा राहिल्याने व्यवसायात पुनर्गुंतवणूक करणे, कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे यांसारख्या बाबींसाठी उद्योगांपाशी पैसाच उरत नाही. साहजिकच, नवनवीन उत्पादन तंत्रे व यंत्रे उद्योगांत आणण्यासाठी निधीची चणचण भासते. गुंतवणुकीवर मर्यादा पडतात. त्यामुळे उद्योगांची कार्यकारी क्षमता कायम निम्न स्तरावरच राहते. त्यांतून उत्पादकता वाढ दुर्बळ राहते व बनते.

खासगी उद्योगांच्याबाबतीत जे घडते तेच जवळपास सरकारी स्तरावरही घडताना दिसते. सरकारी खर्चाचा मुख्य भर हा कल्याणकारी योजनांवरच राहिल्याने अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांच्या गुंतवणुकीबाबत हेळसांड होते. त्यांतून पायाभूत सेवासुविधांचा दर्जा घसरतो. ब्राझीलमधील निकृष्ट रस्ते हे याचे उत्तम उदाहरण ठरावे. एक तर खराब रस्त्यांमुळे वाहतुकीचा सर्वसाधारण सरासरी वेग कमालीचा घटतो. त्यापायी गाड्यांची इंधन कार्यक्षमता मार खाते. त्यांतून वाहतुकीचा खर्च वाढतो. दुसरे म्हणजे, रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांमधून हादरे खात खात मालमोटारी मालाची वाहतूक करतात तेव्हा हिसक्यांपायी जवळपास निम्मा माल रस्त्यांतच पडतो. ब्राझीलमधील मालमोटरी पूर्ण क्षमतेने कधीच भरलेल्या नसतात, हा तिथला ‘‘पॉप्युलर जोक’’ म्हणूनच गणला जातो. वाहतुकीची गती कमालीची संथ राहिल्याने रस्तोरस्ती वाहने तुंबून वेळेचा खोळंबा होतो. या विलंबापायीही वाहतूक खर्चाचा बोजा वाढतो.



जी अवस्था रस्त्यांची तीच अवदशा बंदरांची! ब्राझीलमधील बंदरांचेही अद्ययावतीकरण रखडलेले आहे. मालमोटरींमधून वाहून आणलेला माल साठवून ठेवण्यासाठी बंदरांमध्ये पुरेशी साठवणूक व्यवस्थाच उपलब्ध नाही. कारण, या साठवणूक क्षमतेमध्ये आवश्यक ती भरच वेळोवेळी घातली गेलेली नाही. त्यामुळे, मुळातच रस्त्यांच्या दुरवस्थेपायी निम्म्याशिम्म्या भरलेल्या आणि प्रचंड विलंबाने बंदरात येऊ न पोहोचलेल्या मालमोटरी माल उतरवून तो साठवून ठेवण्याची गोदामेच पुरेशी नसल्याने दिवसेंदिवस बंदरांबाहेर तिष्ठत राहतात. मालाची वेळेवर चढउतार दुरापास्त ठरते कारण बंदरांतील गोदामांत जागाच नसते. एक वेळ गोदामांत जागा असेल तर मालमोटरींमधील मालाची चढउतार करण्यासाठी, साठवणूकयोग्य मालाची कार्यक्षम हाताळणी करण्यासाठी स्वयंचलित वा यंत्रचलित व्यवस्थाच बंदरांत बसवलेली नाही अथवा नसते. यां सगळ्यांपायी मालाची वाहतूक दिरंगाईची बनते आणि त्याचबरोबर वाहतूक खर्चात वाढही होते. या सगळ्याच्या बरोबर विरु द्ध चित्र चिनी अर्थव्यवस्थेत पाहावयास मिळते. पायाभूत सेवासुविधांमध्ये भरभक्कम गुंतवणूक करण्यास प्राधान्य देण्याच्या चिनी धोरणांपायी चीनमधील रस्ते, बंदरे, वाहतूक, दळणवळण, साठवणूक यांसारख्या सेवासुविधा कमालीच्या कार्यक्षम आहेत. ब्राझीलमधील धोरणांचा मुख्य भर हा कल्याणकारी योजनांवर राहिल्याने पायाभूत सेवासुविधांमधील गुंतवणुकीची आबाळ होऊन तिची परिणती एकंदरच अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता उणावण्यात घडून येते.

अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांचे जाळे सक्षम राखण्यासाठी आवश्यक असणारी गुंतवणूक वेळच्या वेळी केली गेली नाही तर अपु-या गुंतवणुकीपायी अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता घटते इतकेच केवळ नव्हे तर, त्यांपायी अर्थव्यवस्थेतील पुरवठ्याची बाजूच एकंदरीने कमकुवत राहते. त्याच वेळी, सरकार राबवत असलेल्या नानाविध कल्याणकारी योजनांद्वारे अर्थव्यवस्थेमध्ये क्रयशक्तीचे अभिसरण घडून येत राहते. त्यांमुळे, अर्थव्यवस्थेतील मागणी सशक्त व वाढती राहते. लवचीक मागणीच्या तुलनेत अर्थकारणातील पुरवठ्याची बाजू (गुंतवणुकीची आबाळ झाल्यामुळे) अ-लवचीक राहिल्याने मागणी व पुरवठ्यातील दरी रुंदावत जाते.

मागणी व पुरवठ्यातील अशी रुंदावणारी दरी महागाईची जन्मदात्री ठरते. अर्थव्यवस्थेतील पुरवठ्याची बाजू जोवर सुदृढ बनत नाही तोवर मागणी व पुरवठ्यातील तफावत आटोक्यात येणे दुष्कर बनते. साहजिकच, महागाईचे आव्हान आपले बस्तान दृढ करत राहते. ब्राझीलची आजची समस्या हीच आहे. त्यामुळे, अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वार्षिक सरासरी दर अडीच टक्क्यांइतक्या निम्न स्तरावर राहूनही ब्राझीलला महागाईचा सामना करावा लागतो आहे. कल्याणकारी योजनांवर असणारा भर आणि त्यांपायी पायाभूत सेवासुविधांमधील अपुरी गुंतवणूक हे या सगळ्या दुरवस्थेचे मूळ कारण. वाहतूक, साठवणूक, प्रशिक्षित मनुष्यबळ, भांडवल... यांसारख्या मुख्य उत्पादक घटकांच्या किमतींच उच्च पातळीवर राहिल्याने ब्राझीलमधील उद्योगांचा उत्पादन खर्च उच्च आहे. हा वाढीव उत्पादन खर्च उत्पादक वाढीव किमतींच्या रूपाने ग्राहकांच्या खिशाकडे मग सरकवत राहतात.

चीन आणि ब्राझीलच्या तुलनेत बरेच निराळे दिसत असले तरी अर्थकारणाच्या व्यवस्थापनाचा विचार करता रशियाचे चित्र फारसे काही वेगळे म्हणवत नाही. तिथेही संरचनात्मक असंतुलन आहेच. त्याच्याच जोडीने, रशियाच्या पुढ्यात कडवे आव्हान आहे ते आर्थिक वाढविकासाच्या हातात हात घालून तिथे नांदणा-या विषमतेचे आणि विरोधाभासांचे निराकरण घडवून आणण्याचे. सत्तासंपादनानंतर पुतीन यांनी खासगी उद्योगांना रशियामध्ये वाव दिला, यांबाबत दुमत नाही. परंतु, सार्वजनिक उद्योग आणि खासगी उद्योग यांच्या वाढविस्तारात मुबलक आणि मोठी विचित्र विभागणी तिथे दिसते. किरकोळ व्यापार, माध्यमे, माहिती-तंत्रज्ञान, नानाविध प्रकारच्या ग्राहकोपयोगी जिनसा व सेवा... यांसारख्या तुलनेने नवजात उद्योगक्षेत्रांमध्ये खासगी उद्यमशीलतेला रशियाने अलीकडील काळात वाव दिलेला आहे. असे असले तरी, संवेदनशील गणली जाणारी अन्य सर्व उत्पादन क्षेत्रे तिथे सरकारच्याच मालकीची आहेत. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, रशियाची अर्थव्यवस्था अलीकडील काळात ज्या दोन खनिज पदार्थांवर विसंबलेली आहे ती खनिज तेल व नैसर्गिक वायू उत्खननाची क्षेत्रे संपूर्णतः सरकारी अधिपत्याखाली आहेत. त्याच्याच जोडीने खाणउद्योगावरही अधिसत्ता आहे ती सरकारचीच.



रशियाची अर्थव्यवस्था एकंदरीने खनिज तेलावर निर्भर असल्याने खनिज तेलाच्या बाजारभावांतील हेलकाव्यांनुसार तिचे भागधेय हिंदकळत राहते. २००८ सालातील वित्तीय अरिष्टानंतर खनिज तेलाच्या बाजारभावांमध्ये एकदम पडझड घडून आली. तिचा प्रतिकूल असर रशियाच्या अर्थकारणावर लगोलग जाणवला. मुळात, खनिज तेल व वायूचा उद्योगच सरकारी मालकीखाली असल्याने रशियातील उद्योगक्षेत्रामध्ये सरकारी मालकीच्या आणि/अथवा सरकारनियंत्रित अजस्त्र उद्योगांचा वरचष्मा आहे. याच दोन उद्योगक्षेत्रांत पैसा आणि राजकीय ताकद एकवटलेली असल्याने रशियातील उद्योगक्षेत्रांत प्रदीर्घ काळ पोसत आलेला ''स्ट्रक्चरल'' असमतोल नांदताना दिसतो. या असंतुलित वाढीची जाणीव आता रशियातील धोरणकर्त्यांना प्रकर्षाने होत असल्याने तेल व खनिज वायू यांच्याव्यतिरिक्त अन्य उद्योगधंदे विकसित करण्यावर तिथे आता भर देण्यात येतो आहे. रशियाच्या उद्योगक्षेत्राचे आणखी एक वैशिष्ट्य (खरे पाहता एक मोठे वैगुण्य) म्हणजे लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगांचा तिथे नसलेला मागमूस. लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगांचे क्षेत्र रशियामध्ये जणू अस्तित्त्वातच नाही. त्यामुळे, रशियातील उद्योगांचा वाढविस्तार विकेंद्रीत पद्धतीने होणे दुरापास्त ठरते. साहजिकच, उद्योगांचे परंपरागत केंद्र असलेल्या मोजक्या मोठ्या शहरांमध्येच उद्योगांचे केंद्रीकरण झालेले आहे. मुळात गंमत म्हणजे रशियामध्ये ख-या अर्थाने ''मोठी'' शहरे म्हणता येतील अशी पाचच शहरे आहेत. उद्योगांच्या विकेंद्रीकरणाला हातभार लावणारी विकेंद्रीत आणि कार्यक्षम अशी बँकिंग व्यवस्था वा रचनाही रशियात आजमितीस सर्वदूर कार्यरत नाही.

एका बाबतीत मात्र रशिया आणि ब्राझीलमध्ये ब-यापैकी साम्य दिसते. ती बाब म्हणजे पायाभूत सेवासुविधांच्या आबाळीची. अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढविणा-या पायाभूत सेवासुविधांमध्ये पुरेशी गुंतवणूक होत नसल्याने ब्राझीलप्रमाणेच रशियाच्या अर्थव्यवस्थेतील पुरवठ्याची बाजू कमकुवत राहिलेली आहे. त्यामुळे, ब्राझीलप्रमाणेच रशियामध्येही महागाईचा काच अर्थव्यवस्थेला सतत जाणवत राहतो. एकंदरीने पाहता, ''ब्रिक्स'' समूहातील देशांसमोरील आव्हाने गुंतागुंतीची आहेत. ■■

सामाजिक

# स्थित्यंतराच्या मार्गावरील ब्राझील

जागतिक पातळीवर ब्राझील चर्चेत राहिला आहे तो फुटबॉलसाठी. फुटबॉलचा विश्वचषक पाच वेळा जिंकणारा ब्राझीलचा चमू या खेळातील उत्कृष्ट चमू समजला जातो. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने बाझीलचा जगात पाचवा क्रमांक लागतो. पूर्वेला अटलांटिक महासागराचा ७४९१ किलोमीटर इतका मोठा किनारा या देशाला लाभला आहे. त्या भूप्रदेशात ब्राझीलवुड हे वृक्ष मोठ्या प्रमाणावर होते व कापड उद्योगाला लागणारा लाल रंग त्या झाडांमधून मिळत असे. त्यामुळे युरोपीय देशांमधील व्यापा-यांचे लक्ष त्या भूमीकडे वेधले गेले. या झाडावरून त्या देशाला 'ब्राझील' म्हटले जाऊ लागले. १६व्या शतकात तेथील स्थानिक जमातींनी (Tupi) ब्राझीलवुडची लागवड मोठ्या प्रमाणावर करून हा रंग युरोपीय व्यापा-यांना विकला होता. काही अभ्यासकांच्या मते स्थानिकांनी या भूमीला Pindorama (land of Palm trees) असे म्हटले होते. पोर्तुगीजांची वसाहत असलेल्या या देशाला स्वातंत्र्य मिळाले ते १८२२ मध्ये. पोर्तुगीज गेले, पण आजही पोर्तुगीज हीच त्या देशाची अधिकृत भाषा आहे ! कालांतराने १८८९मध्ये तेथे अध्यक्षीय राज्यपद्धती आली (presidential republic). त्या नंतर १९८८ पासून ब्राझील हे संघराज्य (federal republic) आहे. पूर्वी म्हणजे १८२४मध्ये आकाराला आलेले दोन सभागृहे असलेले कायदेमंडळ आजही तिथे कार्यरत आहे. आता त्याला 'काँग्रेस' असे म्हटले जाते. आजघडीला या देशाचे चित्र कसे आहे ते समजून घेणे उद्‌बोधक ठरावे.

'वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था' म्हणून हा देश अलीकडच्या काळात ओळखला गेला. पण गेल्या दोन वर्षांत या देशाच्या वाढीचा दर एकदम घसरलेला दिसतो. २०१०मध्ये तेथील आर्थिक विकासाचा दर ७.५ टक्के इतका होता. २०११मध्ये तो अधिक घसरून २.७ टक्के आणि २०१२मध्ये तर तो त्या पेक्षाही कमी होऊन ०.९ टक्क्यांवर पोहचला आहे. त्यामुळे हा देश पुन्हा एकदा तज्ज्ञांच्या चर्चेत आला आहे.



ब्राझीलची अर्थव्यवस्था विकसित होण्याच्या काळात म्हणजे १९७० नंतरच्या दशकांमध्ये तेथील श्रीमंत अधिक श्रीमंत झाले. त्या तुलनेने गरीबांच्या स्थितीत फारसा फरक झाला नाही. तेव्हा तेथील अभ्यासकांनी ब्राझीलचे वर्णन 'बेलइंडिया' या शब्दात केले होते. ब्राझीलमध्ये श्रीमंत नागरिकांचे साधर्म्य 'बेल्जियम' या देशातील नागरिकांमध्ये तर गरीबांचे साधर्म्य भारतातील नागरिकांमध्ये शोधले गेले. म्हणजे, ब्राझीलमध्ये जणू बेल्जियम (श्रीमंत गट) व भारत (गरीब गट) असे दोन देश नांदत आहेत, असे म्हणून ब्राझीलला 'बेलइंडिया' असे म्हटले गेले होते. आर्थिक विषमतेचे प्रमाण मोठे असलेल्या देशांमध्ये ब्राझीलचा समावेश होतो. सार्वजनिक आरोग्य सेवा मिळणे तिथे 'लॉटरी' असल्यासारखे मानले जात होते. पण आता या परिस्थितीत थोडा बदल झालेला आहे. गरिबीचे प्रमाण सुमारे दोन-तृतीयांशाने घटले आहे. गरीब गटात मोडणा-या नागरिकांचे वास्तव उत्पन्न सुमारे दुपटीने वाढले आहे. तर श्रीमंत गटातील नागरिकांचे उत्पन्न एक-पंचमांशापेक्षा कमी वाढले आहे. आर्थिक विषमता मोजणा-या Gini's coefficientने तिथे अगदी गेल्या ५० वर्षात प्रथमच नीचांकी पातळी गाठली आहे, म्हणजे विषमता कमी झाली आहे, असा त्याचा अर्थ होय.

ब्राझीलची एकूण लोकसंख्या सुमारे २० कोटी असून त्यांतील निम्म्यांपेक्षा अधिक नागरिकांचा समावेश कनिष्ठ मध्यमवर्गात होतो. या गटातील नागरिकांचे दरमहा उत्पन्न तेथील चलनानुसार साधारणपणे २९१ ते १०१९ reais म्हणजे १२७ ते ४४६ अमेरिकी डॉलर इतके आहे. सरकारी योजनेतून मिळालेल्या भरघोस मदतीमुळे उत्पन्नातील ही वाढ घडून आली, असे जाणकार म्हणतात. तेथील अनेक कुटुंबे आता पक्क्या घरात वास्तव्यास असून त्यांच्या घरी कुकर, फ्रीज अशा वस्तू आता दिसू लागल्या आहेत. घराघरांतले चित्र असे काहीसे बदललेले असले तरी सार्वजनिक ठिकाणी परिस्थिती जैसे थे असल्याचे आढळते. रस्त्यांवरील वाहनांची गर्दी वाढत असून रस्त्यांची दुरवस्था आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपुरी पडते आहे. शालेय शिक्षणाचीही अवस्था फारशी वेगळी नाही. काही शाळांमधून तीन पाळ्यांमधून (शिफ्ट) शिक्षण देण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांचा लाभदेखील सर्वांपर्यंत पोहचलेला नाही.

विकासाच्या या प्रक्रियेत बाझीलमध्ये मध्यमवर्गात मोडणा-या नागरिकांची संख्या हळूहळू वाढते आहे. सरकारकडून असलेल्या आपल्या अपेक्षा व्यक्त करण्यात हा गट पुढाकार घेतो आहे. या गटाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तेथील सरकारला पायाभूत सोयी-सुविधा वाढवण्यावर भर द्यावा लागणार आहे आणि त्यासाठी खाजगी क्षेत्राची मदतही घ्यावी लागणार आहे. अर्थात, ही बाब तेथील सरकार जाणून आहे. पण त्याबाबत अद्याप ठोस कृती झालेली नाही. दरम्यान, आजमितीस सरकारी खर्चाचे एकूण राष्ट्रीय उत्पादनाशी असलेले प्रमाण ३८.५ टक्के इतके आहे. ते वाढवण्यापेक्षा सरकारने अन्य काही उपाययोजना आखाव्यात असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. या देशाबाबत लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची बाब अशी की, १५ ते ५९ या वयोगटातील आर्थिकदृष्ट्या क्रियाशील गणल्या जाणा-या नागरिकांचे प्रमाण भरपूर आहे. तसेच त्यांच्यावर अवलंबून असणा-यांचे प्रमाण कमी आहे. या तरूणांना नोकरी-व्यवसायाच्या विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होण्याची गरज आहे. पण त्यांच्यासाठी विशेष धोरणे आखून देशाच्या विकासात त्यांना सहभागी करून घेण्यात सरकार मागे पडते आहे, असे मत मांडण्यात येते.

'गुणवत्तापूर्ण शिक्षण' हाही तिथे चर्चेचा मुद्दा बनला आहे. एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या ५.६ टक्के इतका खर्च शिक्षणासाठी केला जातो. हे प्रमाण चांगले म्हटले जाते. हा खर्च केल्याने शाळांमधील उपस्थिती वाढलेली आढळली तरी गुणवत्तापूर्ण शालेय शिक्षण पोहचवण्यात सरकारला यश आलेले दिसत नाही. तेथील १५ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांचे अंकगणित, विज्ञान आणि भाषा हे विषय बरेच कच्चे असल्याचे एका अभ्यासातून आढळले. शिक्षणासाठी करण्यात आलेला खर्च हा गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी खर्च होतोच असे नाही. शाळामधील शिक्षकांसाठी चांगली वेतनश्रेणी नसल्याने शाळांमधून शिकविण्यासाठी चांगले शिक्षक मिळत नाहीत. तर दुसरीकडे, सेवानिवृत्त शिक्षकांच्या निवृत्तीवेतनावर होणा-या खर्चाचे प्रमाण बरेच मोठे आहे. असे असताना शिक्षणावरील खर्चात वाढ करण्याचा प्रस्ताव सरकारकडे आहे. मात्र, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विचार सरकारला प्राधान्याने करावा लागेल.



सेवानिवृत्ती योजना हा तेथील चर्चेतील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या योजनेत बरेच बदल करण्याची गरज आहे असे सुचविण्यात आले आहे. ब्राझीलमध्ये सरकारी सेवेत असणा-या अधिका-यांना भरघोस सेवानिवृत्त वेतन दिले जाते. नोकरीची किमान १५ वर्षे पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत्ती घेता येते व निवृत्तीवेतनाचा लाभही घेता येतो. शिवाय, चलनवाढ लक्षात घेऊन त्यानुसार निवृत्तीवेतनात दरवर्षी वाढही होत जाते. त्यामुळे नोकरी लवकर सोडून निवृत्त होण्याकडे अनेकांचा कल वाढतो. तसेच सेवानिवृत्त व्यक्ती दिवंगत झाल्यानंतर त्याच्यावर अवलंबून असणा-या जोडीदाराला त्याचे संपूर्ण निवृत्तीवेतन मिळते (काही देशांमध्ये जोडीदाराला निम्मेच निवृत्तीवेतन मिळते). त्यामुळे सरकारवरील निवृत्तीवेतनाचा बोजा वाढतो.

बाझीलमधील वाढता नवमध्यमवर्ग हा एक अभ्यासाचा विषय आहे. 'ग्राहकराजा' म्हणून अर्थव्यवस्थेच्या संदर्भात तो महत्त्वाचा आहेच. शिवाय, राजकीय घडामोडींबाबत 'सजग नागरिक' बनू पाहणारा हा वर्ग आहे. स्वाभाविकच तेथील समाजजीवनाचा तो महत्त्वाचा घटक आहे. या मध्यमवर्गाचे वर्तन व विचार याचा विचार धोरणकर्त्यांना करावा लागतो आहे. अर्थ-उद्योग-व्यापारात हा वर्ग मोलाची भूमिका बजावतो.

या संदर्भात तेथील समाजजीवनातील एक विशेष बाब म्हणजे तेथील स्त्रिया सौंदर्यप्रसाधने, केशभूषा आणि वेषभूषा यांवर मोठा खर्च करतात. विशेषतः, केसांची निगा हा तेथील स्त्रियांच्या जिव्हाळ्याचा विषय असून केसांची निगा राखणा-या उत्पादनांच्या विक्रीत ब्राझील दुस-या क्रमांकावर आहे. गंमत म्हणजे, बेताची मिळकत असणा-या स्त्रियाही यासाठी बराच खर्च करीत असतात. ब्राझीलमधील Natura हा स्थानिक ब्रँड प्रसिद्ध असून सौंदर्यप्रसाधनांच्या बाजारपेठेतील १३.४टक्के भाग या ब्रँडचा आहे. Naturaमध्ये वनस्पतीजन्य घटकांचा समावेश आहे. त्यातही ॲमेझॉनच्या खो-यातील वनस्पतींचा समावेश अग्रक्रमाने असून स्थानिकांकडून शुद्ध कच्चा माल मिळविण्यात येतो. त्यामुळे, ब्राझीलच्या नागरिकांसाठी हा खास 'स्वदेशी' ब्रँड आहे. सुमारे ६० टक्के घरांमध्ये Naturaच्या उत्पादनांची खरेदी केली जाते. अलीकडे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील जगप्रसिद्ध ब्रँड्स्ची उत्पादने तेथील बाजारपेठेत आढळत आहेत.

## नागरिक व निवडणूक सुधारणा ?

राजकारण व राजकीय क्षेत्रातील अपप्रवृत्ती हा ब्राझीलमध्ये एक काळजीचा विषय बनलेला आहे. ब्राझीलच्या संसदेत म्हणजे तेथील काँग्रेसमध्ये दर तीनांमधील एका काँग्रेससदस्यावर गुन्हेगारीचे आरोप आहेत. मते विकत घेणे हा प्रकार तिथे सर्रास चालतो. लाचलुचपत, आर्थिक गैरव्यवहार तिथे नित्याचेच झाले आहेत. पण अशा नेत्यांना हटविणे हे अवघड काम आहे; आणि यामागे ब्राझीलमधील मतदान पद्धत व न्यायसंस्थेतील त्रुटी कारणीभूत ठरत आहेत, असे म्हटले जाते.

ब्राझीलच्या काँग्रेसची दोन सभागृहे आहेत. 'फेडरल सिनेट' हे वरचे सभागृह तर 'चेंबर ऑफ डेप्युटीज्' हे खालचे सभागृह होय. सिनेटमध्ये २६ राज्ये व 'फेडरल डिस्ट्रीक्ट्स्' यांचे प्रतिनिधी असतात. 'चेंबर ऑफ डेप्युटीज्'मध्ये राज्यांमधील मतदारसंघांमधून प्रमाणशीर पद्धतीने उमेदवार निवडले जातात. दर चार वर्षांनी या निवडणुका घेतल्या जातात. प्रत्येक राज्यामधून तीन सिनेटसदस्य आणि खालच्या सभागृहासाठी ८ ते ७० प्रतिनिधी निवडले जाऊ शकतात. त्यामुळे मतदानपत्रिकेत राजकीय पक्षांच्या यादीतील उमेदवारांची संख्या खूप असते. आपण कोणत्या पक्षाच्या कोणत्या उमेदवाराला मत दिले हे लक्षात ठेवणे मतदारांसाठीही अवघडच ठरते. मोठे प्रांत, विरळ लोकसंख्या, गरीब व कमी शिकलेले नागरिक या सर्व बाबी पाहता राजकीय पक्ष आणि मतदार यांच्यात एक प्रकारे आश्रयदाते व आश्रित अशा प्रकारचे संबंध (clientalism) तयार होतात. मत देण्याच्या बदल्यात आश्रितांची (मतदारांची) कामे आश्रयदात्यांनी (राजकीय पक्ष/नेते) करायची, अशी सौदेबाजी होते. ब्राझीलमध्ये आणखी एक महत्त्वाचे असे की कधी कधी नागरिकांनी न निवडून दिलेली व्यक्तीही नागरिकांचे प्रतिनिधित्व करू शकते. कारण तेथे पोटनिवडणुकांची पद्धत नाही. म्हणजे निवडून आलेला उमेदवार काही कारणाने आपला ठरावीक कार्यकाळ पूर्ण करू शकला नाही तर त्याच्याऐवजी कोण प्रतिनिधित्व करेल हे निवडणुकीच्या वेळीच ठरलेले असते. तेथील पद्धतीनुसार एका उमेदवाराला जिंकण्यासाठी आवश्यक आहेत त्यापेक्षा अधिक मते मिळाली तर ती मिळालेली अधिक मते त्याच्या मित्रउमेदवारांमध्ये विभागली जातात.



निवडून येण्याची क्षमता नसलेल्या उमेदवारांना अशा मैत्रीपूर्ण मतांच्या जोरावर निवडून आणणे राजकीय पक्षांना शक्य होते. म्हणून मते खेचणाऱ्या उमेदवारांना राजकीय पक्ष प्राधान्य देतात. आणखी एक बाब अशी की एकदा उमेदवार निवडून आला की त्याला पदावरून हटविणे कर्मकठीण आहे. उच्चपदस्थ व्यक्तींवर फक्त सर्वोच्च न्यायालयातच खटले दाखल करता येतात. असा खटला दाखल झाला तरी न्यायालयीन कामकाजाच्या पद्धतींमधील त्रुटींमुळे दोष सिद्ध करणे कठीण असते. स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार (म्हणजे तेथील भाषेत 'ficha limpa') असा कायदा तिथे २०१०मध्ये मंजूर करण्यात आला आहे. वास्तवात तो कायदा किती उपयुक्त ठरतो आहे ते निवडणूका झाल्यानंतरच समजून येईल.

या सर्व बाबींसंदर्भात ब्राझीलमधील नागरिक हळूहळू सजग बनत आहेत. तसेच उद्योगजगतातील धुरीणही गैरप्रकारांबाबत बोलत आहेत. प्रशासनातील अकार्यक्षमतेमुळे आणि राजकीय गैरव्यवहारांमुळे गुंतवणूकदारही तक्रारीचे सूर काढत आहेत. त्यातच अरब जगतातील 'जस्मिन क्रांती'चे वारे ब्राझीललाही स्पर्शून गेले आहेत. अलीकडेच जूनमध्ये झालेल्या सरकारविरोधी निदर्शनात नागरिकांचा मोठा सहभाग होता. 'आपले राजकीय प्रतिनिधी आपले प्रतिनिधित्व करत नाहीत,' अशी भावना त्यांच्या मनात होती. त्या निदर्शनांच्या वेळी कित्येक नागरिकांच्या हाती 'ते माझे प्रतिनिधित्व करीत नाहीत,' असे वाक्य लिहिलेले फलक होते. अशा परिस्थितीत 'निवडणूक सुधारणा' आणि 'लोकशाहीत नागरिकांचा अधिक सहभाग' हे विषय तेथे महत्त्वाचे ठरत आहेत. नागरिकांच्या भावनांची दखल घेऊन लोकाभिमुख व लोकांप्रती उत्तरदायित्व मानून प्रतिसाद देणारी राजकीय व्यवस्था कशी असू शकेल, याची चर्चा तिथे चालू आहे. मुख्य म्हणजे, ब्राझीलमधील या सर्व विषयांबाबत तेथील मध्यमवर्ग अधिक प्रमाणात बोलू लागला आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांना त्याचे म्हणणे समजून, ऐकून घ्यावे लागते आहे. अर्थात, नागरिकांच्या मतांची दखल घेताना सरकारला काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, असे जाणकारांचे मत आहे. त्यातच आर्थिक विकासाचा दर वाढवण्याचे आव्हानही सरकारसमोर आहे. स्थित्यंतराच्या मार्गावरील ब्राझीलचे चित्र असे आहे. ■■

भू-विज्ञान

# मातीमोल नव्हे तर माती 'मोल'!!

आपल्या दैनंदिन आयुष्यातील महत्त्वाचा घटक कोणता, असा प्रश्न कुणाला विचारला तर 'माती' हे उत्तर खचितच मिळणार नाही; मग ती व्यक्ती कोणत्याही 'माती'त जन्मलेली असो. आपल्या माय मराठीमध्ये 'माती' हा शब्द अनेक वाक्प्रचारांमध्ये आढळतो. 'मातीत जन्मणे', 'मातीत मिसळून जाणे', 'पाय मातीचे असणे', 'आयुष्याची माती करणे', 'मातीमोल असणे' इत्यादी. आपण अतिशय सहजपणे हे वाक्प्रचार वापरत असतो. पण खरे तर 'माती' आहे 'अनमोल'! अलीकडे कृषीक्षेत्रातील अभ्यासकांनी 'माती'चे 'मोल' ओळखले आहे. विज्ञानसंशोधनांतून असे आढळून येते आहे की संपूर्ण पृथ्वीवरील जीवसृष्टीचा आधार 'माती' आहे. जैविक विविधता शाबूत राखण्यासाठी 'जीवरक्षक यंत्रणा' म्हणून जणू 'माती' कार्य करते, असे 'द ग्लोबल बायोडायव्हर्सिटी ॲसेसमेन्ट'या दस्तऐवजात नमूद केले आहे. झाडे-झुडूपे, कृमी-कीटक, पशुपक्षी, माणसे यांच्या दृष्टीने पोट भरण्याच्या कामी 'माती' एक माध्यम म्हणून मोलाची भूमिका बजावते.

मातीचा सर्वांत महत्त्वाचा उपयोग आहे तो अन्नधान्य पिकविण्यासाठी. हा उपयोग किती आहे ते समजावून सांगण्यासाठी अभ्यासकांनी दोन उदाहरणे दिली आहेत. एक हेक्टर क्षेत्रफळावर उगवतील एवढ्या वनस्पती जर मातीचा उपयोग न करता पाण्यात पोषक द्रव्ये घालून वाढवायच्या असतील (hydroponics system) तर प्रतिवर्षी ५५ हजार अमेरिकी डॉलर इतका खर्च येईल, हे झाले पहिले उदाहरण. लागवडीखालील मातीची धूप झाल्यामुळे पाणी आणि अन्य पोषक घटक यांचे होणारे नुकसान यांमुळे कृषीक्षेत्राच्या होणा-या संभाव्य हानीचा अंदाज जागतिक पातळीवर मांडायचा झाला तर २५० अब्ज अमेरिकी डॉलर इतके प्रचंड नुकसान दरवर्षी होऊ शकते, हे दुसरे उदाहरण होय. यांवरून मातीचे महत्त्व अधोरेखित व्हावे. थोडक्यात, परिसंस्थेतील (ecosystem) एक महत्त्वाचा घटक म्हणून 'माती'चे कार्य फार उपयुक्त आहे.



अन्नधान्य पिकविण्याच्या कामी 'माती'तील असंख्य सूक्ष्मातिसूक्ष्म असे जैविक घटक मदत करीत असतात. विज्ञानाच्या भाषेत या घटकांना microorganisms असे म्हटले जाते. या जैविक घटकांच्या अस्तित्वामुळे वरकरणी निर्जीव भासणारी माती जणू एक सजीव व्यवस्था म्हणून नांदत असते. मातीच्या अंतरंगात प्रचंड घडामोडी घडून येत असतात. कृमी-कीटक, जीवजंतू, जीवाणू-विषाणू इत्यादींचा मुक्त संचार मातीत होतो. पृथ्वीवरील लोकसंख्येइतक्या वेगवेगळ्या प्रकारचे सूक्ष्मातिसूक्ष्म जैविक घटक फक्त एक चमचाभर मातीत आढळतात! जनुकांच्या - 'डीएनए'च्या - भाषेत सांगायचे झाले तर जैवरासायनिक अशा जनुकीय माहितीने माती अतिशय समृद्ध आहे. एक ग्रॅम कोरड्या मातीत आढळणा-या बॅक्टेरियांद्वारे १५९८ किलोमीटर लांब इतका मोठा 'डीएनए'चा नकाशा उलगडला जाऊ शकतो. मुख्य म्हणजे, सुमारे ४ अब्ज वर्षे इतक्या प्रचंड कालावधीसाठी जैवरासायनिक जनुकांचे जणू ग्रंथालय या माहितीत साठवले असते.

गंमत अशी की मातीतील जैविक घटकांबाबत आजच्या काळात चर्चा चालू असली तरी पूर्वी या विषयाचा संदर्भ कुठे ना कुठे येत असे. जगप्रसिद्ध चित्रकार लिओनार्दो द विन्ची यांनी 'We know more about the movement of celestial bodies than about the soil underfoot' असे म्हटले होते. आता विज्ञानाच्या मदतीने मातीतील घडामोडी स्पष्ट झाल्या आहेत. म्हणजे, जैविक घटकांचे कार्य समजून घेणे शक्य झाले आहे. त्यातील काही महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) पोषक घटकांची चक्राकार साखळी - निसर्गातील विविध घटकांची चक्राकार असलेली साखळी - विशेषतः कार्बनची साखळी - घडवून आणण्यात जैविक घटक साहाय्य करतात. नायट्रोजन, फॉस्फोरस, सल्फर आणि कार्बन यांचे परिसंस्थेतील कार्य एका विशिष्ट पद्धतीने चालते. ते सुयोग्य पद्धतीने चालू राहण्यातील जैविक घटकांचे कार्य महत्त्वाचे आहे.

(२) मातीत मिसळणा-या जैविक पदार्थांचे विघटन होत असते अणि त्यातील प्राथमिक घटक मातीत प्रवेश करीत असतात. हे विघटन घडून येण्यासाठी जैविक घटक मदत करतात. त्यामुळे जैविक पदार्थांमधील रासायनिक रचनेत बदल होऊन वनस्पतींना पोषक घटक उपलब्ध होतात.

(३) खडकांचे रूपांतर यथावकाश मातीमध्ये घडून येण्यासाठी मातीतीलच काही जैविक घटक मदत करतात. जैविक घटकांच्या विविध क्रियाप्रक्रियांद्वारे काही विशिष्ट रसायने मातीत तयार होतात. त्या रसायनांमुळे खडकांचे रूपांतर मातीमध्ये घडण्याची प्रक्रिया घडून येते.

(४) मातीतील जैविक घटकांच्या अस्तित्वामुळे व त्यांच्याद्वारे घडून येणा-या प्रक्रियांमुळे वनस्पती व झाडेझुडुपे यांच्यात कीडीचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध होतो. तसेच, वनस्पतींची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासही मदत होते.

(५) मातीतील नैसर्गिक जैवविविधता जपण्याबरोबरच जमिनीवरील जैविक विविधता जपण्यासाठीही मातीतील हे घटक साहाय्यभूत ठरतात. वनस्पतींच्या सुमारे २० हजारांवर प्रजातींसाठी जैविक घटक कोणत्या ना कोणत्या प्रकारे उपयुक्त ठरतात.

जैविक विविधतेला साहाय्यकारी असणारे हे घटक जणू मातीतील ‘रासायनिक अभियंते’ असतात. त्यांच्या नैसर्गिक प्रक्रियांद्वारे मातीतील अनेक पोषक घटक मुक्त होऊन अन्य जीवसृष्टीला उपलब्ध होतात. निसर्गातील कार्बनची साखळी नियमितपणे कार्यरत असावी यासाठी त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. मातीत मिसळल्या जाणा-या जैवपदार्थांमधील घटकांचे विघटन होताना काही मूलघटक बाजूला केले जातात. ते वनस्पतींच्या वाढीसाठी उपयुक्त ठरतात आणि त्याच वेळी जैवघटक व वनस्पती कुजून humus तयार होते. या त्यांच्या नैसर्गिक क्रियाप्रक्रियांमध्ये कार्बन डायॉक्साइड हा वायू वातावरणात उपलब्ध होतो. या प्रक्रियेत कार्बन डायॉक्साइड हा वायू संपूर्णपणे वातावरणात सोडला जातो असे नाही. काही प्रमाणात तो वायू मातीतील जैविक घटक धरून ठेवतात व तो नंतर उपयोगात आणला जातो. वातावरणात उपलब्ध झालेला कार्बन डायॉक्साइड हा वायू वनस्पतींना उपलब्ध होतो. त्यामुळे सूर्यप्रकाशात वनस्पती आपले अन्न तयार करू शकतात आणि वनस्पतींची वाढ होते. कार्बन डायॉक्साइड हा हरितगृह वायू असून त्याचे वातावरणातील वाढलेले प्रमाण ही जागतिक तापमान-वाढीच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. मात्र, कार्बनच्या अणूचे विशिष्ट गुणधर्म जीवसृष्टीसाठी उपयुक्त आहेत, असे अभ्यासकांनी नोंदवले आहे.



जीवसृष्टीतील प्रत्येक घटकाला जगण्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या ऊर्जेची, अन्नाची गरज असते. जीवसृष्टीला साहाय्यकारी ठरणा-या मातीतील जैविक घटकांनाही ऊर्जेची गरज असते. भलेही ते कितीही सूक्ष्म असोत! त्यांना ऊर्जा पुरवणारा घटक आहे कार्बन. त्यामुळे मातीत कार्बन असणे हे या जैविक घटकांप्रमाणेच संपूर्ण जीवसृष्टीसाठीही गरजेचे आहे. मातीत कार्बनचा साठा जमतो तो तीन मार्गांनी. वनस्पती व सजीव प्राणी मृत झाल्यानंतर मातीत मिसळले जाऊन एकूणांतील सुमारे ८५ टक्के कार्बनचा साठा जमतो, वनस्पतींमधील मुळांपासून १० टक्के साठा मिळतो आणि ऊर्वरित साठा मातीतील जैविक घटकांपासून उपलब्ध होतो. म्हणजे, मातीतील जैविक घटकांना त्यांच्या ऊर्जेसाठी लागणारा कार्बन उपलब्ध होतो तो प्रामुख्याने जमिनीवरील वनस्पती व सजीवांकडून (‘मातीत मिसळणे’ या वाक्प्रचाराचा एक आगळाच अर्थ इथे प्रतीत होतो). मातीतील जैविक घटकांचे कार्य सुयोग्य रीतीने घडून येण्यासाठी कार्बनबाबतची निसर्गाची ही चक्राकार रचना समजून घेऊन माणसांच्या कृती घडणे अपेक्षित आहे.

मातीमध्ये कार्बनचा साठा जमणे आणि मातीमधून तो साठा वातावरणात उपलब्ध होण्याने मातीतील साठा घटणे यांत समतोल साधला जाणे आवश्यक ठरते. पण अलीकडे असे घडत नसल्याचे अभ्यासकांना आढळले आहे. वनस्पती व सजीव यांच्याद्वारे जागतिक पातळीवर मातीत प्रतिवर्षी एकूण साधारणपणे ६०Gt (1Gigatonne = 1 million metric tonnes) साठा जमतो आहे; तर मातीतून ६१ते ६२Gt कार्बनचा साठा वातावरणात उपलब्ध होतो आहे. म्हणजे, मातीतील कार्बनच्या साठ्यात प्रतिवर्षी १ ते २Gt इतकी तूट निर्माण होते आहे. भारतात जिथे जिथे मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते आहे तिथे तिथे मातीमधील कार्बनच्या साठ्यात घट होते आहे, असे आढळते. मातीची धूप आणि जैविक इंधनाचा वाढता वापर यांमुळे तर हा साठा घटतो आहेच. पण त्याचबरोबर शेती करण्याच्या विविध पद्धतींमुळेही हा साठा घटतो आहे. शिवाय, वाढत्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि प्राण्यांसाठी चारा या मूलभूत गरजा भागवतानाही मातीतील कार्बनचा साठा घटत आलेला आहे.

या घटत्या साठ्याचे विपरीत परिणाम भारतातील जैविक विविधतेवर दिसून येत आहेत. शिवाय, मातीवर दुहेरी ताणही पडला. एकीकडे मातीतील कार्बनचा साठा घटत होता व त्यामुळे मातीतील जैविक घटकांना कार्बन उपलब्ध न झाल्याने त्यांच्या कार्यात अडचणी येण्याची शक्यता निर्माण झाली. म्हणजे मातीचा कसदारपणा घटण्याची शक्यता वाढली. तर दुसरीकडे, वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणण्यात आली आणि रासायनिक खतांचा वापर वाढत गेला. परिणामी, मातीचा सकसपणा कमी कमी होत गेला. अर्थात, १९७० ते २००९ या काळात भारतात शेतीतील उत्पादनात सातत्याने वाढ झालेली दिसून आली असली तरी मातीतील कार्बनचा साठा घटत गेला. त्यामुळे मातीचा दर्जा निकृष्ट बनत राहिला. १९७०च्या दशकात 'कार्बनचा सातत्यशीलता निर्देशांक' (C-sustainability index) हा ७ वर होता तो २००९ पर्यंत ३ इतका घसरला. आता मातीतील कार्बनचा साठा वाढवून मातीचा कसदारपणा वाढवण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी अभ्यासकांनी सेंद्रिय शेतीचे बीज रोवणारे सर अल्बर्ट हॉवर्ड (इ.स.१८७३-१९४७) यांनी मांडलेल्या 'लॉ ऑफ रिटर्न'कडे वळण्याची गरज असल्यावे मत मांडले आहे. केंब्रिज विद्यापीठातून वनस्पतीशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर हॉवर्ड यांनी १९०५ ते १९३१ या काळात भारतात शेतीविषयक मोठे कार्य केले होते. 'लॉ ऑफ रिटर्न' म्हणजे 'निसर्गाकडून घेतलेले निसर्गाला परत द्या' अशी त्यांची शिकवण होती. माणसाने शेती करण्यास सुरुवात केल्याने मातीतील नैसर्गिक पोषक घटकांचे प्रमाण कमी कमी होत जाते, ते पोषक घटक पुनःपुन्हा उपलब्ध व्हावेत यासाठी मातीचे पोषण केले पाहिजे, असे ते म्हणत असत. जैविक कचरा व पालापाचोळा मातीत मुरला पाहिजे, humus तयार झाले तर मातीचा सकसपणा टिकून राहील, यावर त्यांनी कायम भर दिला होता. वाढत्या लोकसंख्येच्या नानाविध गरजा पूर्ण करताना भारतात 'लॉ ऑफ रिटर्न'कडे दुर्लक्ष झाल्याने मातीचा कसदारपणा इतका घटला, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. पण आता शेतीचे उत्पादन वाढवायचे असेल तर मातीकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.



मातीतील कार्बनचे प्रमाण वाढविण्यात आले तर गहू, तांदूळ, मका, सोयाबीन इत्यादी पिकांच्या उत्पादनांत मोठी वाढ घडून येते, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. शेतीमध्ये निर्माण झालेला जैविक कचरा मातीत जिरवता आला तर मातीतील कार्बनची वाढ शक्य आहे. भारतात शेतीविषयक विविध कामांमध्ये असा कचरा मोठ्या प्रमाणावर तयार होतो. त्या कच-याचे व्यवस्थापन हा भारतातील शेतीसंदर्भात महत्त्वाचा मुद्दा ठरतो. भारतातील शेती उद्योगाचा विचार केला तर ५० कोटी टन इतका प्रचंड जैविक कचरा दरवर्षी तयार होतो, असे भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या २००९ मधील एका अहवालात म्हणण्यात आले आहे. अनेकदा हा कचरा प्राण्यांसाठी चारा/खाद्य म्हणून उपयोगात आणण्यात येतो. कधी तो बांधकामाचे साहित्य तयार करण्याच्या कामीही वापरला जातो. तरीदेखील ब-याच मोठ्या प्रमाणावर कचरा तसाच पडून राहतो किंवा तो चक्क जाळला जातो. असा कचरा जाळताना कार्बन डायॉक्साइड हा वायू निर्माण होऊन तो वातावरणात पसरतो. त्यामुळे हरितगृह वायूंच्या प्रमाणात वाढ होते.

त्यापेक्षा हा कचरा सुयोग्य पद्धतीने मातीत मिसळला गेला तर मातीतील कार्बनचे प्रमाण वाढून मातीतील जैविक घटकांना ऊर्जा मिळू शकते व मातीचा कसदारपणा वाढू शकतो. या संदर्भात अलीकडे भारतातील अभ्यासक चर्चा करीत असून आवश्यकतेनुसार उचित तंत्रज्ञानाच्या निर्मितीवर भर देण्याची शक्यताही पडताळून पाहिली जाते आहे. Humus to Human to Humus असे म्हणण्याचा व हे तत्त्व कृतीत आणण्याचा प्रयत्न होतो आहे. उल्लेखनीय बाब अशी की, मानवजातीसाठी वापरण्यात येणारा लॅटिन भाषेतील homo हा शब्द humus या शब्दापासून तयार झाला आहे! संपूर्ण सजीव सृष्टी कार्बनच्या अस्तित्वामुळे आकाराला आली आहे व मातीतील कार्बनच्या अस्तित्वामुळे ती टिकणार आहे. मातीतील सूक्ष्मातिसूक्ष्म जैविक घटक हे आता अभ्यासकांच्या चर्चाविश्वात केंद्रस्थानी येत आहेत. मानवी शरीरात तर अब्जावधी सूक्ष्म जीवजंतू (बॅक्टेरिया) असतात! वनस्पतींच्या वाढीसाठीही मातीचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. आपल्या सर्वांचे पोट भरणा-या मातीचे म्हणजे एका परीने सूक्ष्मातिसूक्ष्म जैविक घटकांचे भरणपोषण करण्याची जबाबदारी आता माणसांची आहे. ■■

मानसशास्त्र

# दुःखातही आहे सुख!

धकाधकीच्या जीवनात, घड्याळ्याच्या काट्याबरोबर धावताना 'मनःस्वास्थ्य टिकवा, आनंदी राहा म्हणजे काम करण्याचा उत्साह वाटेल' असे अनेकदा विविध माध्यमांद्वारे सांगितले जात असते (फुकट सल्ले!). सतत आनंदी कसे राहावे याचे खास मंत्रतंत्रही शिकवले जाते! आता सदासर्वकाळ सर्वांना आनंदी राहता आले असते तर माणसांच्या जीवनात दुःखाला, खिन्नतेला काही स्थान उरले नसते! पण लक्षात कोण घेतो? 'जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारे मना तूची शोधून पाहे' असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे; तर, जगाच्या रहाटगाडग्यात 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे' असे तुकोबांनीही म्हणून ठेवले आहे. 'सुख व दु;ख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत' असेही म्हटले गेले आहे. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीनुसार प्रत्येक जण आनंदी वा दुःखी असण्यामागे वेगवेगळी कारणे असणे स्वाभाविकच आहे. त्याचप्रमाणे काहींना सुखही बोचते तर काहींना दुःखातही सुख मिळते! पण साधारणपणे सुख मिळाले की माणसांना आनंद होतो आणि दुःखामुळे माणसे खिन्न वा दुर्मुखलेली असतात असे आढळते. या भावावस्था अगदी सहज निर्माण होतात. या भावावस्थांचा अभ्यास अलीकडे मानसशास्त्रज्ञ करत आहेत.

या भावावस्थांचा वेगवेगळा परिणाम माणसांच्या विचारप्रक्रियांवर घडून येत असतो. आनंदात, सुखात असताना माणसे सकारात्मक विचार करतात तर खिन्नावस्थेत असताना नकारात्मक विचार मनात येतात, असे साधारणपणे म्हटले जाते. पण माणसांच्या विचारप्रक्रियेतील वेगवेगळे टप्पे महत्त्वाचे असतात आणि त्यांवर भावावस्थांचा वेगवेगळा परिणाम होऊ शकतो, ही बाब इथे लक्षात घ्यावी लागते. एखाद्या व्यक्तीच्या आनंदी अथवा खिन्न भावावस्थेनुसार त्या त्या वेळी साकारणारी विशिष्ट विचारप्रक्रिया ही योग्य म्हणावी की नाही हे त्या त्या वेळच्या चांगल्या वा वाईट परिस्थितीवर अवलंबून असते. परिस्थितीमुळेदेखील विशिष्ट विचारप्रक्रिया घडू शकते.



कधी कधी खिन्न, उद्विग्न मनःस्थितीतही माणसे एखाद्या बाबीसंदर्भात सर्वंकष व खोलवर विचार करू शकतात. तसेच, त्या वेळी विश्लेषणात्मक विचार अधिक चांगल्या पद्धतीने होतो आणि त्या संदर्भातील अधिक तपशील त्यांना आठवण्याची शक्यता वाढते. मनाची अशी स्थिती असताना माणसे अधिक काळजीपूर्वक विचार करतात. वाईटाकडे जाणा-या संभाव्य शक्यताही त्यांच्या लक्षात येतात. परिस्थितीचे गांभीर्य अधिक नेमकेपणाने जाणवते. परिस्थितीने वेळीच दिलेले योग्य इशारे समजून घेतले जातात. त्यामुळे योग्य निर्णय घेणे व त्यानुसार कृती करणे शक्य होते. हाती घेतलेले काम स्वखुशीने तडीस नेण्याचाही प्रयत्न व्यक्तीकडून अशा वेळी केला जातो. गंमत अशी की, खिन्न असतानाही कधी एकदम वेगळा विचार (म्हणजे, 'थिंकिंग आउटसाइड द बॉक्स') सुचू शकतो. त्यामुळे एखाद्या प्रश्नावर अचानक उत्तर मिळू शकते. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, अशा वेळी माणसे मिळणारे बक्षीस वा फायदा यांचे वाटप समन्यायी पद्धतीने व्हावे याकडे ते लक्ष देतात. तसेच, एखादी व्यक्ती काही महत्त्वाच्या प्रसंगाची साक्ष देत असेल तर जमेल तेवढे तपशील आठवून चुकीची माहिती दिली जाणार नाही याची खबरदारी तेव्हा तिच्या मनाकडून घेतली जाते. खिन्न परिस्थितीत मनाने चांगला विचार करणे ही दुःखातही सुखाची बाब ठरते!

आता सुखात काय घडते ते पाहा! माणसे सुखात असतात म्हणजे बहुतांश वेळा आनंदी असतात! घडून येणारी विचारप्रक्रिया अशा वेळी वेगळ्या प्रकारची असते. तेव्हा रचनात्मक बाबींकडे असलेला कल वाढतो. एका वेळी अनेक कामे करण्याला (multitasking) माणसे प्राधान्य देतात. कोणताही गंभीर प्रश्न समोर उभा ठाकलेला नसतो तेव्हा 'सर्व काही आलबेल आहे,' असा संदेश मनाला मिळतो. भोवतालची परिस्थिती अनुकूल असताना एका प्रकारे मन निवांत असते. अशा वेळी मनाला फार धावपळ करण्याची गरज नसल्याने माणसे 'स्व'चा विचार अधिक करत असावीत, असा अभ्यासकांचा कयास आहे. अर्थात, अशा काही बाबी अभ्यासांतून पुढे येत असल्या तरी प्रत्येकाच्याबाबतीत असेच घडेल असेही नाही, कारण प्रत्येकाची पिंडप्रकृती भिन्न असते.

असे असले तरी या संदर्भात अभ्यासकांनी काही गंमतीशीर प्रयोग करून बघितले आहेत. एखाद्या व्यक्तीबाबत कोणतेही मत बनवताना त्या व्यक्तीची प्रथमदर्शनी पडलेली छाप ही महत्त्वाची असते, असे म्हटले जाते. अभ्यासकांच्या भाषेत हा ‘हॅलो इफेक्ट’ असतो. मनाची स्थिती खिन्न वा आनंदी असताना या बाबत काय घडते ते पाहण्यासाठी अभ्यासकांनी प्रयोग केला. तत्त्वज्ञानावरील एक निबंध त्या प्रयोगात उपस्थितांना वाचण्यासाठी देण्यात आला. हा निबंध कोणी लिहिला असेल याबाबतचा अंदाज येण्यासाठी एक छायाचित्र मजकुरासोबत जोडले होते. काही प्रतींवर सुटाबुटातल्या व्यक्तीचे छायाचित्र जोडलेले होते तर काही प्रतींवर एका तरुणीचे छायाचित्र जोडण्यात आले होते. अभ्यासकांना असे आढळले की खिन्न असणा-या व्यक्तींनी तो मजकूर अधिक काळजीपूर्वक व जास्त वेळ वाचला. तसेच, तो लिहिणा-या व्यक्तीच्या छायाचित्राकडे त्यांचे फारसे लक्ष गेले नाही किंवा तो कोणी लिहिला असेल याबाबत त्यांना उत्सुकता वाटली नाही. म्हणजे, त्यांच्याबाबतीत ‘हॅलो इफेक्ट’ घडला नाही. तर दुसरीकडे, आनंदी असणा-या व्यक्तींचा तो निबंध कमी वेळेत वाचून झाला आणि तो निबंध सुटाबुटात असणा-या अभ्यासक व्यक्तीने लिहिला असावा, असे त्यांना वाटले. खिन्न वा आनंदी या दोन्ही गटांत न मोडणा-या सर्वसाधारण वाचकांनादेखील हा निबंध सुटाबुटातल्या अभ्यासक व्यक्तीने लिहिला असावा असे वाटले, पण आनंदी व्यक्तींनी त्याबाबत जेवढे ठाम मत मांडले तेवढे ठाम मत मात्र त्यांनी मांडले नाही. म्हणजे, सर्वसाधारणपणे ‘हॅलो इफेक्ट’ सर्वांवर होतो पण खिन्न असणा-यांवर तो अल्पसाच होत असावा असा निष्कर्ष अभ्यासकांनी काढला आहे.

व्यक्तीची त्या त्या वेळची मानसिक स्थिती तिच्यासाठी जणू अगदी वास्तव अशी असते आणि व्यक्तीच्या त्या वेळच्या एकूण वर्तनावर प्रभाव पाडणारी असू शकते. ‘आपल्याला मिळालेल्या बक्षीसाचा काही वाटा संगणकावर दाखवण्यात येणा-या व्यक्तीला द्यायचा,’ असे एका प्रयोगात म्हटल्यानंतर खिन्न असणा-यांनी समान वाटा दिला तर आनंदी व्यक्तींनी स्वतःसाठी जास्त वाटा ठेवून घेतला. खिन्न व्यक्ती दुस-याचा अधिक विचार करत असाव्यात असे यावरून अभ्यासकांना वाटते.



खिन्न असणा-या व्यक्ती माहितीची देवाणघेवाण अधिक करतात असेही काही अभ्यासकांना वाटते. पाहिलेला एखादा प्रसंग समोरच्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटीत सांगताना वा लिहून कळवताना त्यातील जास्तीत जास्त तपशील समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न खिन्न गटात मोडणा-या व्यक्ती करतात, असे अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. अर्थात, जेव्हा आपल्या जवळची माहिती दुस-याला सांगायची नसते तेव्हा मात्र ती आपल्याजवळ राखून ठेवायचे भानही अनेकांना असते किंवा व्यवहारज्ञानातून ते त्यांना मिळत असते, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. कोणतेही काम करताना माणसांची भावावस्था महत्त्वाची असते. दैनंदिन व्यवहारातील अनेक कामे करताना खिन्न गटातील व्यक्ती वेगवेगळ्या पर्यायांचाही विचार अधिक करत असतात, असेही काही अभ्यासकांनी नोंदले आहे. भावावस्थेतील विचारप्रक्रियांबाबतचे अभ्यास करताना अशा काही प्रयोगांमधून पुढे आलेले हे निष्कर्ष हे आजघडीला केवळ दिशादर्शक आहेत, असे अभ्यासकांना वाटते. मात्र, यावरून विचारप्रक्रियेबाबतचा अधिक अभ्यास करणे शक्य व्हावे अशी अपेक्षा आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# *अर्थबोधपत्रिका पुरवणी*

## आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद

## निकड, किमान समान आर्थिक कार्यपत्रिकेची...

आपल्या देशात १९९१ साली अवतरलेल्या आर्थिक पुनर्रचना युगाचे बीजारोपण तत्कालीन आर्थिक पेचप्रसंगामध्ये झालेले होते. तो पेच खरोखरच गंभीर होता. त्यामुळे, देशाच्या अर्थकारणाचे तारू सावरण्याच्या दृष्टीने अर्थव्यवस्थापनात तेव्हा जे काही बदल अथवा सुधारणा तातडीने करणे गरजेचे होते ते ते बदल व सुधारणा हाच तेव्हाच्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा गाभा ठरला. देशाच्या अर्थव्यवस्थापनासंदर्भात त्या वेळी सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षाचे मूलभूत अशा स्वरूपाचे मनःपरिवर्तन झाल्यामुळे आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला त्या पक्षाने तेव्हा हात घातला, असे काही तर अजिबातच घडलेले नाही. मुळात, देशाच्या राजकीय व आर्थिक व्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवादाच्या विचारप्रणालीचा स्वीकार केला गेल्याने जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या अर्थविकासविषयक धोरणांचा तोंडवळा प्रथमपासूनच समाजवादसन्मुख व समाजवादपूरक अशा प्रकारचा राहिलेला होता व आहे.

---

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक-संचालक आणि देशातील एक विख्यात अर्थतज्ज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन दिवसांचे एक चर्चासत्र संस्थेच्यावतीने दरवर्षी आयोजित करण्यात येते. त्या परिपाठानुसार, आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद या बीजविषयाला वाहिलेले यंदाचे चर्चासत्र तारीख २ व ३ ऑगस्ट २०१३ या दोन दिवशी आयोजित करण्यात आले होते. दोन दिवसांच्या त्या चर्चासत्रामध्ये निमंत्रित अभ्यासकांनी मांडलेल्या विचारांचा एकत्रित आणि संक्षिप्त गोषवारा या ठिकाणी सादर करीत आहोत. जागेची मर्यादा लक्षात घेता सगळ्याच मुद्यांचा परिचय वाचकांना घडविणे अवघड आहे. त्यामुळे, महत्त्वाच्या परंतु प्रातिनिधिक पैलूंचे सार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. - संपादक*



अर्थव्यवहारांचे नियंत्रण आणि अर्थव्यवस्थेत निर्माण होणा-या नानाविध वस्तू व सेवा, संपत्ती, मालमत्ता, उत्पन्न, रोजगार संधी इत्यादींचे वाटप-वितरण घडवून आणण्यात ''सरकार'' आणि ''बाजारपेठ'' या दोन संस्थांची भूमिका मध्यवर्ती राहते. सरकार आणि बाजारपेठ (पर्यायाने खासगी क्षेत्र) यांच्या कार्यक्षेत्रांची फेरआखणी आर्थिक पुनर्रचना पर्वामध्ये अध्याहृत असते. खुल्या बाजारपेठीय व्यवहारप्रणालीचे स्थान व भूमिका आर्थिक पुनर्रचनेंतर्गत नेमकी कशी असेल अथवा कशी असावी यांबाबत आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेत कार्यरत असलेल्या अग्रगण्य राजकीय पक्षांची ठोस, प्रगल्भ, विचारांती निश्चित केलेली, सुस्पष्ट अशी भूमिका दिसत नाही. याला एकमात्र अपवाद असेल तर तो डाव्या पक्षांचा. त्यामुळे, १९९१ साली आपल्या देशात उद्‌भवलेल्या आर्थिक आणिबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्या वेळी जो काही आर्थिक पुनर्रचना कार्यक्रम हाती घेतला गेला त्याला सुसूत्र, सुसंघटित, तर्कशुद्ध असा प्रतिसाद राजकीय व्यवस्थेकडून आजवर दिला गेल्याचे दिसत नाही. आजची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. तो तो पक्ष त्या त्या वेळी सत्ताधीश आहे की विरोधी भूमिकेत आहे त्यावर त्या त्या पक्षाच्या प्रतिक्रियेचे अथवा प्रतिसादाचे रूप-स्वरूप अवलंबून असल्याचे आपण पाहतो. आजचा मोठा तिढा कोणता असेल तर तो हाच. आर्थिक पुनर्रचनेबाबत आणि मुख्यतः आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये खुल्या बाजारपेठेचे स्थान नेमके काय असावे यांबाबत जोवर आपल्या राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्ष प्रगल्भ, विचारपूर्वक बनविलेला विचारव्यूह अथवा मत निश्चित करत नाहीत तोवर आर्थिक पुनर्रचनेला आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेकडून सुसूत्र आणि तर्कशुद्ध प्रतिसाद दिला जाणे दुष्कर ठरावे.

अर्थात, हे एकाएकी घडून येणार नाही. मुळात, देशाच्या अर्थकारणाचे व्यवस्थापन सुविहितपणे करण्याच्या दृष्टीने जे काही कळीचे मुद्दे आहेत त्या मुद्यांबाबत राजकीय व्यवस्थेतील प्रमुख राजकीय पक्षांमध्येच किमान सहमतीचा अभाव दिसतो. देशाचे अर्थचित्र सुभग बनविण्याच्या दृष्टीने कोणकोणत्या गोष्टी ताबडतोबीने करणे निकडीचे आहे यांबाबत आपल्या देशातील राजकीय पक्ष मुदलातच अनभिज्ञ आहेत, असे मुळीच नाही.

आपल्या देशातील राजकीय पटलावर सक्रिय असणा-या अग्रगण्य राजकीय पक्षांना देशाच्या आर्थिक स्थितीची, ती स्थिती सुधारण्यासाठी जे बदल अथवा सुधारणा घडवून आणणे निकडीचे आहे अशा सुधारणांची जाण नाही असे समजणे अनुचित ठरेल. परंतु, निकडीचे असणारे ते उपाय योजण्याबाबत देशातील अग्रगण्य राजकीय पक्षांमध्ये मतैक्य घडून येताना दिसत नाही, हेही तितकेच खरे. किंबहुना, असे मतैक्य अथवा सहमती प्रस्थापित व्हावी यांसाठी काही प्रयत्न होत असल्याचेही दृष्टीस पडत नाही. किमान सहमती निर्माण करण्याबाबत कोठे काही प्रक्रिया घडत आहेत असेही अनुभवास येत नाही. आज सर्वाधिक निकड जाणवते ती अशा किमान समान आर्थिक कार्यक्रमाची अथवा कार्यक्रमपत्रिकेची. देशाच्या अर्थकारणाचे व्यवस्थापन काटेकोर कार्यक्षमपणे होण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत जोवर व्यापक राजकीय सहमती घडून येत नाही, देशाच्या अर्थकारणाचे हित केंद्रवर्ती ठेवून जोवर राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्षांदरम्यान किमान समान आर्थिक कार्यक्रमाची वा कार्यपत्रिकेची निश्चिती होत नाही तोवर आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला सुसूत्र, तर्कशुद्ध आणि प्रगल्भ असा राजकीय प्रतिसाद मिळण्याबाबतची अपेक्षा धरता येणार नाही. आणि तशी अपेक्षा धरली तरी ती फलद्रुप होणे अवघड ठरेल. असा प्रतिसाद मिळत नसल्यानेच प्रशासनयंत्रणेचे हात बांधल्यासारखे होतात. कार्यालयीन तसेच प्रशासकीय निर्णयप्रक्रिया योग्य प्रतिसादाअभावी ढिली पडते. त्यांतून निर्णयप्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब लागतो. अशा विलंबांपायी विकासप्रकल्पांची मंजुरी लांबणीवर पडते. हे सगळे सुसूत्रमय बनावयाचे तर आर्थिक पुनर्रचनेसंदर्भातील किमान समान कार्यपत्रिकेच्या जोडीनेच प्रशासकीय सुधारणांनाही आपल्या देशात गती देण्याची गरज आहे.

देशासमोरील कळीच्या आर्थिक समस्यांबाबत अथवा आव्हानांबाबत किंवा देशाच्या आर्थिक परिस्थितीसंदर्भात राजकीय पक्षोपक्षांपाशी काही एक किमान विचारसरणीचा अथवा धोरणदृष्टीचा अभाव का जाणवतो, हा या सगळ्यांतील खरा महत्त्वाचा आणि खोलात शिरून अभ्यासावयाचा मुद्दा होय. स्वातंत्र्यानंतर नियोजनप्रधान आर्थिक विकासाच्या प्रणालीची जी कास आपण धरली तिचा हा आनुषंगिक परिणाम असावा का ?



स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांनी, म्हणजे, १९५० साली आपल्या देशात केंद्रीय नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. देशाचे पंतप्रधान हे केंद्रीय नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्याचप्रमाणे, केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक खात्यांचे मंत्रिमहोदय नियोजन आयोगाचे सन्मान्य सदस्य म्हणून नियुक्त केले जातात. साहजिकच, देशाच्या विकासासंदर्भात केंद्रीय नियोजन आयोग जी धोरणविषयक भूमिका अथवा दृष्टी अवलंबेल आणि तिला अनुसरून जे काही विकासविषयक उपक्रम अथवा योजना तयार करील तीच धोरणविषयक दृष्टी व विकासोपक्रम काँग्रेस पक्षाने स्वीकारावी हे ओघानेच आले. स्वातंत्र्यानंतर घडले ते नेमके हेच. देशातील एक अग्रगण्य राजकीय पक्ष म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसचा उदय झाला. केवळ केंद्रातच नव्हे तर देशातील अनेक राज्यांत तोच पक्ष सत्तेवर होता. त्यामुळे, केंद्रीय नियोजन आयोगाने देशाच्या विकासासंदर्भात स्वीकारलेली धोरणविषयक दृष्टी आणि तयार केलेली योजना व तिच्या अंतर्गत असलेले उपक्रम-कार्यक्रम आपाततः काँग्रेस पक्षाची विकासविषयक दृष्टी व धोरणे ठरत गेली. केवळ केंद्रातच असे घडत राहिले असे नाही तर जिथे जिथे म्हणून काँग्रेस पक्ष सत्तेवर होता त्या राज्याराज्यांतही हेच घडत राहिले. केंद्र सरकारच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासविषयक धोरणांच्या निश्चितीमध्ये केंद्रीय नियोजन आयोगाची भूमिका जशी व जितकी महत्त्वाची ठरत असे जवळपास तितकीच महत्त्वाची भूमिका केंद्रीय नियोजन आयोग राज्याराज्यांतील विकासविषयक धोरणांच्या निश्चितीमध्ये बजावत असे. किंबहुना, आपापल्या कार्यक्षेत्रात राबविण्यासाठी ज्या पंचवार्षिक तसेच वार्षिक योजना राज्य सरकारे तयार करीत असत त्यांची छाननी करून त्यांवर अनुमतीची मोहोर उमटवण्याचे कामही केंद्रीय नियोजन आयोगच करत असे.

परिणामी, आपला पक्ष सत्ताधीश असलेल्या राज्याराज्यांतील लोकांच्या स्थानिक गरजा नेमक्या काय आहेत, त्या त्या प्रांतातील विकासविषयक प्राधान्यक्रम काय असावयास हवा, त्यांनुसार राज्याराज्यांतील सरकारांनी कोणकोणत्या उपक्रमांना हात घालावयास हवा...यांबाबतचे विचारमंथनच काँग्रेस पक्षाच्या स्तरावर घडून येईनासे झाले.

अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या तसेच प्रांतिक काँग्रेस समित्यांच्या बैठकांमध्ये, वस्तुतः, अशा प्रकारचे विचारमंथन घडून येणे अपेक्षित होते. आर्थिक विकासासंदर्भात केंद्रीय नियोजन आयोगाने स्वीकारलेल्या धोरणदृष्टीला आणि तिला अनुषंगून सुचविलेल्या उपक्रम व योजनांना सहमती दर्शवणे एवढे एकच काम या समित्यांना मग उरले. हाच परिपाठ यथावकाश काँग्रेस पक्षाच्या अंगवळणी पडला असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. आजघडीला जवळपास सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची अवस्था या बाबतीत जवळपास एकसारखीच आहे.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची तामिली आपल्या देशात सुरू झाल्यापासून गेल्या दोन दशकांदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढ्यात डोळ्यांत खुपण्याजोग्या ज्या ज्या आर्थिक समस्या उभ्या ठाकलेल्या दिसतात त्यांची दखल आणि त्यांबाबत करावयाच्या उचित अशा उपाययोजनांबाबत चर्चा-मसलत यांचा आपल्या देशातील अग्रगण्य राजकीय पक्षांच्या पक्षांतर्गत व्यासपीठांवर संपूर्णतः अभाव दिसतो (अर्थात, याला काही सन्मान्य अपवाद हे आहेतच) ही खरोखरच विषण्ण बनवणारी बाब होय. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमोत्तर कालखंडातील राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीचे हे अतिशय मोठे वैगुण्यच म्हटले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेस पक्ष असा नव्हता. स्वतंत्र होऊ घातलेल्या देशाच्या आर्थिक तसेच सर्वसाधारण विकासाच्या गरजा काय आहेत, त्या गरजांचा प्राधान्यक्रम काय असावयास हवा, त्या दृष्टीने कोणते उपक्रम अथवा योजनांची अंमलबजावणी करणे अगत्याचे ठरते.., अशांसारख्या बाबींसंदर्भात काँग्रेसच्या व्यासपीठावरून स्वातंत्र्यपूर्व काळात अतिशय मूलभूत चिंतन मोठ्या गांभीर्याने केले जात असे. स्वातंत्र्यानंतर मात्र ते सारे जणू लुप्तच झाल्यासारखे वाटते काँग्रेस पक्ष जेव्हा सत्तेवर असतो त्या वेळी देशाच्या आर्थिक गरजांच्या अनुषंगाने विचारमंथन होते. नाही असे नाही. त्या नंतर काही उपक्रम वा योजनाही राबविल्या जातात. मात्र, अशा विचारविनिमयाचा मुख्य भर हा त्या त्या कार्यक्रमापुरताच सीमित राहत असल्याचे जाणवते. देशाच्या अर्थकारणाच्या तळाशी असणारे प्रवाह, त्यांत घडून येणारे बदल यांचे भान अशा चर्चांदरम्यान केंद्रस्थानी आवर्जून ठेवले जात असावे, याचा प्रत्यय मात्र येत नाही. ■■




## वाचकांच्या माहितीसाठी

## आरोग्यसंस्कार

आजच्या धकाधकीच्या काळात सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे या दृष्टीने प्रत्येकाच्या मनावर आरोग्यसंस्कार व्हावेत म्हणून **आरोग्यसंस्कार** हे मासिक गेल्या पाच वर्षांपासून प्रसिद्ध केले जाते. आयुर्वेदीय आरोग्यसंस्कार हा विषय त्यात केंद्रस्थानी आहे. डॉ. रोहित माधव साने हे या मासिकाचे प्रकाशक असून डॉ. यश वेलणकर संपादक आहेत. महेश खरे हे कार्यकारी संपादक आहेत. (**वार्षिक वर्गणी १५० रु पये**)

**पत्ता - आरोग्यसंस्कार, इंदिरा स्मृती, अग्यारी रस्ता, जांभळी नाका, ठाणे (पश्चिम), ४००६०१ दूरध्वनी (०२२)६७७१५४००/२५३८०४४०**


## निवेदन

‘अर्थबोधपत्रिके’मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना ‘पत्रिके’बाबत वाटणा-या आत्मीयतेची, ‘अर्थबोधपत्रिके’च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या ‘अर्थबोधपत्रिके’च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव ‘पत्रिके’च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास ‘अर्थबोधपत्रिके’साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने ‘पत्रिके’च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे ‘अर्थबोधपत्रिके’चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. ‘अर्थबोधपत्रिके’वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines -**
(1) The Economist September 28 th-October 4th 2013.
(2) Current Science - volume 105 Number 7, 10th October 2013

**(B)Books/Reports -**
(1) Breakout Nations : In Search of the Next Economic Miracles, Ruchir Sharma, Allen Lane Penguin books, 2012.

**(C) Websites**
(1) http://www.westonaprice.org/farm-a-ranch/history-of-organic-farming (2) http://www.sciencenews.org/article/bright-side-sadness

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**The Darwin Economy : Liberty, Competition, and the Common Good, Robert H. Frank, Princetion University Press, 2011, New Jersey, United States of America, pp. 248, Price - $ 16.95.**

जगभरात घडणारे असंख्य अर्थव्यवहार व त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा एक क्लिष्ट अभ्यास विषय आहे. मानवाची उत्क्रांती होत गेली, तो टोळीने, समूहाने वास्तव्य करू लागला, तेव्हापासूनच माणसांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारचे देवघेवीचे व्यवहार घडत आलेले आहेत. अर्थात, आज ज्या ज्ञानशाखेला अर्थशास्त्र असे म्हटले जाते ते त्या वेळी उदयास आलेले नव्हते. उत्क्रांतीचे एकेक टप्पे पार करताना विविध अभ्यासशाखा उदयास आल्या. आजच्या आधुनिक अर्थशास्त्राचा पाया रचला गेला तो ॲडम स्मिथ यांच्या 'द वेल्थ ऑफ नेशन्स' (An Inquiry into the Nature and Causes of the Wealth of Nations हे त्या ग्रंथाचे मूळ नाव) या १७७६ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाने. अर्थशास्त्राचा अभ्यास पुढे जात असतानाच मानव समूहांची उत्क्रांती हा विषयही अभ्यासला जात होता. चार्ल्स डार्विन हे उत्क्रांतीवादाचे जनक. On the Origin of Species हा त्यांचा ग्रंथ १८५९साली प्रसिद्ध झाला. Survival of the fittest व competition ही उत्क्रांतीवादाची मूळ तत्त्वे होत. डार्विन यांनी मानवी उत्क्रांतीच्या संदर्भात मांडलेले अन्य काही सिद्धांत बाजारपेठीय स्पर्धेवर बेतलेल्या अलीकडच्या अर्थव्यवहारांच्या संदर्भात पडताळून पाहिले तर ते अधिक चपखलपणे लागू पडू शकतात. त्यामुळे, ॲडम स्मिथ यांच्याऐवजी चार्ल्स डार्विन यांच्याकडेच आधुनिक अर्थशास्त्राच्या पायाभरणीचा बहुमान येत्या शतकभरात जाऊ शकेल, असे प्रतिपादन 'द डार्विन इकॉनॉमी' या ग्रंथाने केले आहे. आर्थिक साक्षरता ही आजची गरज बनली असताना उत्क्रांतीवादाची तत्त्वे आणि अर्थशास्त्र यांचा अभ्यास पुढे आणणारा हा ग्रंथ विचक्षण वाचकांसाठी उपयुक्त ठरावा. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक
●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**